स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपूर्वी लोकप्रतिनिधींना स्वेच्छा निधीतून (Discretionary Grant) खर्च करण्यावर निर्बंध...

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक : रानिआ-२०१६/लोस्वेनि/प्र.क्र.१२/सं.क.
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ५ ऑक्टोबर, २०१६.

## आ दे श

लोकसभा व विधानसभेच्या निवडणुका संविधानातील तरतुदीनुसार निर्भय, मुक्त व पारदर्शक होण्याच्या दृष्टीने निवडणुकीच्यावेळी पक्षाची व उमेदवारांची वर्तणूक कशी असावी याबाबत सर्व राजकीय पक्षांनी १९६६ मध्ये एक आदर्श आचारसंहिता तयार केली. ही आचारसंहिता जरी लोकसभा व विधानसभेने पारित केलेला अधिनियम नसला तरीही सर्व राजकीय पक्ष, शासन व मा. न्यायालयाने त्यास पाठिंबा दिला असून, प्रत्येक निवडणुकीमध्ये या आदर्श आचारसंहिते (वेळोवेळी सुधारणांसह) प्रमाणे कार्यवाही केली जाते.

२. देशाच्या, राज्यांच्या व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या स्तरावर अर्थसंकल्पीय तरतुदीमधून खर्च केला जातो. याशिवाय, निवडून आलेल्या प्रतिनिधींना स्थानिक स्तरावर सामाजिक कामांवर खर्च करण्यासाठी काही स्वेच्छा निधी (Discretionary Grant) उपलब्ध करून दिला जातो.

३. निवडणुकांपूर्वी काही लोकप्रतिनिधी स्वेच्छा निधी मतदारांवर प्रभाव टाकण्याच्या उद्देशाने, खर्च करतात ही बाब लक्षात घेता मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपिल क्र.१६३२/१९६७ घासी राम विरुध्द दाल सिंग व इतर या प्रकरणामध्ये खालील प्रमाणे अभिप्राय नोंदविले :

*"..... १४. we are constrained to say that the attitude of Government is far from laudable. Election is something which must be conducted fairly. To arrange to spend money on the eve of elections in different constituencies although for general public good, is when all is said and done an evil practice, even if it may not be corrupt practice. The dividing line between an evil practice and a corrupt practice is a very thin one. It should be understood that energy to do public good should be used not on the eve of elections but much earlier and that even slight evidence might change this evil practices into corrupt practice. Payments from discretionary grants on the eve of elections should be avoided."*

४. आदर्श आचारसंहिता निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रम जाहिर केलेल्या दिनांकापासून किंवा निवडणुकीची अधिसूचना काढलेल्या दिनाकांपासून लागू करण्यात यावी, याबाबतचा प्रश्न मा. उच्च न्यायालय, पंजाव व हरियाणा यांनी श्री. हरबंससिंग जलाल यांच्या प्रकरणी दिनांक २७/५/१९९७ रोजी खालीलप्रमाणे अभिप्राय देऊन निकाली काढलेला आहे :-

> *"On the basis of the observations made by the Supreme Court regarding payments from the discretionary grants at the disposal of the Ministers on the eve of election. Election Commission suggested law to be passed on the issue. Government of India, after considering that suggestion, took a decision that instead of making provisions in the rules regulating the disbursements from the discretionary grants, a convention should be adopted that for a period of three months immediately prior to the polling no expenditure should ordinarily be incurred from the Ministers discretionary grants. So also, the Government of India in their communication dated October 28, 1969, took the view that instead of making any specific provision in the rules regulating disbursement from discretionary grants, a convention should be evolved that for a period of three months immediately prior to the*

*polling, no expenditure should ordinarily be incurred from a Minister`s discretionary grant. These decisions taken by the Government show that Government was inclined to have conventions on these matters and not to have statutory provisions. In such a situation, the action on the part of the Election Commission in directing Governments to follow the model code of conduct adopted by the various national parties appears to be quite legal and not only be free form corrupt practices but also free from evil practices.*

५. मा. उच्च न्यायालयाच्या वरील आदेशाप्रमाणे राज्य निवडणूक आयोग ज्या दिवशी निवडणुका घोषित करेल त्या दिवसापासून संबंधित क्षेत्रात आदर्श आचारसंहिता लागू करण्यात येते. या आचारसंहितेच्या कालावधीमध्ये मतदारांवर प्रभाव टाकून निवडणुकांवर विपरीत परिणाम होणार नाही याकरिता राज्य निवडणूक आयोगाने अनेक निर्बंध घातलेले आहेत. मात्र, निवडणूक कार्यक्रम जाहिर होण्यापूर्वीच्या कालावधीसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये मा.उच्च न्यायालयाच्या वरील आदेशाप्रमाणे स्वेच्छा निधी (Discretionary Grant) यावर कोणतेही निर्बंध घालण्यात आलेले नाहीत.

६. भारत सरकारच्या दिनांक २८/८/१९६९ च्या मार्गदर्शक सूचना व त्यावर मा. उच्च न्यायालयाचे वरील आदेश (परिच्छेद-४) लक्षात घेता सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये लोकप्रतिनिधीद्वारे स्वेच्छा निधीमधील करण्यात येणाऱ्या खर्चावर निर्बंध घालणे आवश्यक आहे. या सर्व बाबींचा विचार करून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक होण्याच्या दृष्टीने राज्य निवडणूक आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे :-

७. आदेश

७.१ कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सार्वत्रिक किंवा पोटनिवडणुकीमध्ये संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेची मुदत संपण्याच्या तीन महिने आधीपासून किंवा निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्यापासून, यापैकी जे अगोदर घडेल त्या दिनांकापासून कोणत्याही लोकप्रतिनिधींना त्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रातील कामांवर स्वेच्छा निधीतून खर्च करता येणार नाही.

७.२ वरील निर्बंध कोणत्या दिनांकापासून लागू होतील याबाबतचे आदेश, संबंधित जिल्हाधिकारी (जिल्हा परिषद/पंचायत समिती, ग्रामपंचायती, नगर परिषदा/नगर पंचायतीकरिता) व महानगरपालिका आयुक्त (महानगरपालिकांकरिता) यांनी निर्गमित करावेत.

७.३ वरील दिनांकानंतर (परि.७.२) कोणत्याही लोकप्रतिनिधीने स्वेच्छा निधीतून कोणत्याही प्रकारचे आश्वासन देऊ नये किंवा मंजुरीसाठी नव्याने प्रस्ताव संबंधित अधिकाऱ्याकडे सादर करु नये.

७.४ स्वेच्छा निधीतून काम मंजुर करणाऱ्या, कार्यारंभ आदेश देणाऱ्या किंवा प्रत्यक्ष काम करणाऱ्या अधिकारी यांनी खालील बाबींचे कटाक्षने पालन करावे.

i. वरील दिनांकानंतर (परि.७.२) कोणत्याही नवीन कामाच्या प्रस्तावास मंजुरी देऊ नये.

ii. वरील दिनांकापूर्वी (परि.७.२) प्रस्ताव मंजूर असेल, पण प्रत्यक्ष कामास सुरुवात झाली नसेल तर कार्यारंभ आदेश देऊ नये किंवा कामास सुरुवात करु नये.

iii. वरील दिनांकापुर्वी (परि.७.२) जर प्रत्यक्ष कामाची सुरुवात झाली असेल तर ते काम सुरु ठेवावे.

७.५ सर्व लोकप्रतिनिधी (मंत्री व राज्यमंत्री सह) यांना हे आदेश लागू राहतील.

८. वरील निर्बंध न पाळल्यास, ते काम मतदारांवर प्रभाव टाकण्याच्या उद्देशाने करण्यात आल्याचे गृहित धरण्यात येऊन त्या कामास त्वरित स्थगिती देण्यात यावी व संबंधित अधिकाऱ्याविरुध्द योग्य ती कारवाई करण्यात यावी.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार.

( शेखर चन्ने )
सचिव
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

टिप :- सर्व अधिकाऱ्यांनी याबाबत संबंधितांना आवश्यक त्या सूचना दाव्यात.

प्रत:-

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. मा. मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. सचिव, विधी मंडळ, विधानभवन, मुंबई.
५. प्रधान सचिव, वित्त व नियोजन, मंत्रालय, मुंबई ३२.
६. प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. सर्व विभागीय आयुक्त (कोंकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर)
९. आयुक्त (सर्व महानगरपालिका)
१०. जिल्हाधिकारी, (सर्व)
११. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद (सर्व)
१२. मुख्याधिकारी नगर परिषदा/ नगरपंचायती (सर्व)
१३. मा. आयुक्त यांचे स्वीय सहायक, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
१४. मा. सचिव यांचे स्वीय सहायक, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
१५. आयोगातील सर्व कार्यासने
१६. निवड नस्ती

राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

निवडणूक तात्काळ

क्रमांक: रानिआ/नप-२०१६/प्र.क्र. ३१/का-६,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २०/१२/२०१६.

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद

विषय:- आदर्श आचारसंहितेमध्ये दिलेल्या सूचनेनुसार मार्गदर्शन मिळणेबाबत.

संदर्भ:- १. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचेकडील ई-मेल दि.१७/१०/२०१६.

२. Civil Writ Side Civil writ petition No.270 of 1997 decision. Dated- 27/05/1997.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचे पत्र क्रमांक- कोजिप/वित्त/आस्था/१/कावि/निवडणूक/२०१६, दिनांक ०९/१२/२०१६. (प्रत संलग्न)

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी राज्य निवडणूक आयोगाकडे जिल्हा परिषद स्वनिधी अंतर्गत विकास कामांसाठी केलेल्या या तरतुदी वितरण व खर्चासाठी सदर तीन महिने कालावधी लागू राहील अथवा कसे? याबाबत मार्गदर्शन मागविले आहे.

२. याविषयी आपले लक्ष राज्य निवडणूक आयोगाच्या क्रमांक-रानिआ-२०१६/लोस्वेनि/प्र.क्र.१२/सं.क्र., दिनांक-५/१०/२०१६ कडे वेधण्यात येत आहे. हे आदेश सर्वच लोकप्रतिनिधींना लागू आहेत. त्यात खासदार, मंत्री, आमदार यांचेसमवेत जिल्हा परिषद/पंचायत समित्यांचे पदाधिकारी, सदस्य यांचादेखील समावेश होतो.

३. मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(स्वाक्षरी)

( ध. मा. कानेड )
उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग